**विशेष पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ**

**दिनांक १४/०५/२०२३**

---

# विजय टोळे हत्याकांडातील उर्वरीत चार आरोपीतांना स्थानिक गुन्हे शाखे कडुन अटक

पोलीस स्टेशन अवधुतवाडी येथे अपराध क्रमांक ६८२/२०२३ कलम ३९६, ३०२, २०१ भादवि चा गुन्हा नोंद असुन तपासावर आहे. सदर गुन्हयात दिनांक १३/०५/२०२३ रोजी सहा आरोपीतांपैकी आरोपी नामे १) गौरव भारत उमाटे वय२८ वर्ष २) अमित राजकुमार यादव वय २८ वर्ष दोन्ही रा. लोहारा यांना अटक करण्यात आली होती.

नमुद गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेण्याबाबत मा. पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांना आदेशीत केले होते त्याच अनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी त्यांचे अधिनस्त पथकास गोपनिय माहीती काढुन आरोपीतांचा शोध घेवुन त्यांना अटक करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

दिनांक १४/०५/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पाहिजे असलेल्या आरोपीतांचा शोध घेत असतांना माहिती मीळाली की, गुन्हयातील चारही आरोपी हे देविनगर लोहारा परिसरात आपले अस्तीत्व लपवुन वावरत आहेत अशा माहिती वरुन आरोपीतांचा शोध घेतला असता आरोपी नामे १) आदित्य मनोज पाली वय २१ वर्ष रा. कमलेश्वर चौक, लोहारा २) दिपक उत्तम पुराम वय २४ वर्ष रा. देविनगर लोहारा हे मीळुन आल्याने त्यांना गुन्हयासंबधाने विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली देवुन त्यांचे सोबत यापुर्वी अटक झालेले आरोपी गौरव उमाटे व अमित यादव तसेच आणखी दोन आरोपी नामे १) अंकुश अविनाश रामटेके वय २१ वर्ष रा. देविनगर लोहारा २) फुलचंद सुधाकर कासार वय २३ वर्ष रा. देविनगर लोहारा हे सोबत असल्याचे सांगीतल्याने त्यांना देविनगर लोहारा परिसरातुन ताब्यात घेण्यात आलेले असुन आरोपीतांना पुढील कारवाई करिता पोलीस स्टेशन अवधुतवाडी चे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरचा गुन्हा हा अत्यंत क्लिष्ट, गुंतागुंतीचा आव्हानात्मक असुन सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक यवतमाळ डॉ. श्री. पवन बन्सोड, अपर पोलीस अधीक्षक श्री. पियुष जगताप, यांचे मार्गदर्शनात श्री. प्रदीप परदेशी पो.नि. स्थागुशा, सपोनि विवेक देशमुख, पोहवा सैयद साजीद, बंडु डांगे, अजय डोळे, रुपेश पाली, नापोशी विनोद राठोड, निलेश राठोड चालक पोहवा जितेंद्र चौधरी, अमीत कुमरे सर्व स्थागुशा यांचे पथकाने यशस्वीरित्या पार पाडली आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ**